ePaper
‘मी साधा माणूस, मला हलक्यात घेऊ नका!’ उपमुख्यमंत्री शिंदेंचा भाजपला इशारा




वर्ष - 8 । अंक - 211 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 15 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- आरसीबीच्या पोरींनी घडवला इतिहास
- न्यूझीलंडने पाकिस्तानचा उडवला धुव्वा!
- मी अभ्यासात खूपच साधारण होतो
- मनी लॉंडरिंग गंभीर गुन्हा!



### बळाचा वापर करून केलेले धर्मांतरण रोखण्यासाठी

# ‘लव्ह जिहाद’विरोधात कायदा!

## विशेष समिती स्थापन; कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील दहावे राज्य ठरणार

। मुंबई । महाईन्यूज

**राज्यात लव्ह जिहादच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर लव्ह जिहाद व फसवणूक , बळाचा वापर करून केलेले धर्मांतरण रोखण्यासाठी कायदा करण्यात येणार आहे. यासाठी राज्य सरकारने पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती गठीत केली आहे. ही समिती राज्यातील सध्याची परिस्थितीचा अभ्यास करून लव्ह जिहाद फसवणूक आणि बळाचा वापर करून केलेले धर्मांतरण यावर उपाययोजना सुचवून कायद्याचा मसूदा तयार करणार आहे. त्यामुळे लव्ह जिहादच्या विरोधात कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील दहावे राज्य ठरणार आहे.**



देशात आतापर्यंत उत्तर प्रदेश,हरियाणा, हिमाचल प्रदेश, गुजरात, झारखंड, मध्यप्रदेश, उत्तराखंड, ओडिसा आणि छत्तीसगड या नऊ राज्यांनी लव्ह जिहादविरोधी कायदा आणला आहे. या धर्तीवर महाराष्ट्रातही लव्ह जिहाद कायदा लागू करण्याची मागणी भाजपाचे नेते आणि मंत्री नितेश राणे यांच्यासह राज्यातील विविध हिंदू संघटनांनी केली होती. राज्यातल्या धर्मांतराच्या तक्रारीनंतर या विरोधात कायदा करण्याची ग्वाही तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली होती.

त्यानुसार राज्य सरकारने पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती गठीत केली आहे. या समितीत महिला व बालकल्याण विभागाचे सचिव,अल्पसंख्यांक विकास विभागाचे सचिव, विधी व न्याय विभागाचे सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव, गृहविभागाचे सचिव तसेच गृह विभागाचे ( विधी ) सचिव हे सदस्य असतील.

### समिती कायदेशीर बाबींचा अभ्यास करणार

ही समिती राज्यातल्या सध्याच्या परिस्थितीचा अभ्यास करून लव्ह जिहाद व फसवणूक आणि बळाचा वापर करून केलेले धर्मांतरण यावर उपाययोजना सुचवून, इतर राज्यातील या कायद्याचा अभ्यास करणार आहे. तसेच कायद्याचा मसूदा तयार करणे तसेच कायदेशीर बाबींचा अभ्यास करण्याचे काम ही समिती करणार आहे.

# पुणे रेल्वे स्थानकावर प्रीपेड रिक्षा सेवा पुन्हा बंद

## प्रवाशांना आणि त्यांना घेऊन जाणाऱ्या रिक्षाचालकांना गुंड प्रवत्तीकडून केली जाते दमदाटी

। पुणे । महाईन्यूज

**पुणे रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या सोयीसाठी सुरू केलेली प्रीपेड रिक्षा सेवा स्थानिक गुंड प्रवृत्तीच्या रिक्षाचालकांमुळे पुन्हा बंद पडण्याच्या मार्गावर आहे. प्रीपेड बूथजवळ येऊन प्रवाशांना आणि त्यांना घेऊन जाणाऱ्या रिक्षाचालकांना दमदाटी केली जाते; तसेच दहशत माजवून प्रवाशांना घाबरवले जात आहे. त्यामुळे हा बूथ बंद करण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे. या सर्व गोष्टींकडे स्थानिक पोलिस, वाहतूक पोलिस आणि रेल्वे प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात आहे.**



पुणे रेल्वे स्थानकावरून दररोज दीड ते दोन लाख प्रवाशांची ये-जा सुरू असते. त्यामुळे स्थानकावर नेहमीच गर्दी असते. या ठिकाणी वर्षानुवर्षे रिक्षा चालवण्याचा व्यवसाय करणाऱ्या काही जणांकडून प्रवाशांची अडवणूक करून अव्वाच्या सव्वा भाडे आकारले जाते. ५० ते ६० रुपयांत होणाऱ्या प्रवासासाठी १०० ते २०० रुपये खुलेआमपणे आकारले जातात. त्यामुळेच काही महिन्यांपूर्वी वाहतूक पोलिस, रेल्वे प्रशासन, ‘आरटीओ’ यांच्या मदतीने एका संघटनेने पुणे रेल्वे स्थानकावर प्रीपेड रिक्षा बूथ सुरू केला. त्याचा रात्रीच्या वेळी येणाऱ्या प्रवाशांना खूपच चांगला फायदा होत होता; पण या बुथमुळे प्रवाशांची लूटमार करणाऱ्या रिक्षाचालकांना प्रवासी मिळेना झाले. तरीही ते दमदाटीने प्रवाशांना रिक्षामध्ये बसवण्याचा प्रयत्न करतात; तसेच प्रीपेड रिक्षा बूथवर जाऊन गोंधळ घालणे, तिथे नोंदणी असलेल्या रिक्षाचालकांना दमदाटी करणे, प्रवाशांना दम देणे असे प्रकार घडू लागले आहे.

याबाबत स्थानिक पोलिसांकडे तक्रार केली तरी त्यांच्याकडून काहीही कारवाई केली जात नाही.

### प्रीपेड रिक्षा बूथला संरक्षणाची आवश्यकता

प्रीपेड रिक्षा बूथला चोवीस तास संरक्षण देण्याचे आश्वासन पोलिस प्रशासनाने दिले होते. त्या ठिकाणी किमान एक पोलिस चोवीस तास उपस्थित राहणार होता; पण तसे कोणतेही संरक्षण पोलिसांनी दिले नाही; तसेच यापूर्वीही गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी प्रवासी व रिक्षाचालकांना दमदाटी करून प्रीपेड रिक्षा बूथ बंद पाडले होते. त्यामुळे आता तरी पोलिसांनी या प्रीपेड रिक्षा बूथला संरक्षण देण्याची आवश्यकता आहे.

## जलसंपदा विभागाने महापालिकेला बजावली दुसरी नोटीस

# थकबाकी द्या, अन्यथा पाणीकपात!

## पुणे महापालिकेचा इशारा, 31 मार्च शेवटची तारीख

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘पुणे महापालिकेने पाणी वापराबाबतची ७१४ कोटी रुपयांची थकबाकी येत्या २५ फेब्रुवारीपर्यंत भरा; अन्यथा पाणीकपातीस तयार राहा,’ अशा शब्दांत जलसंपदा विभागाने पुणे महापालिकेला पाणीपुरवठा कमी करण्याचा इशारा दिला आहे. जलसंपदा विभागाने या संदर्भातील दुसरी नोटीस महापालिकेला बजावली असून, पुण्याचा पाणीप्रश्न ऐन उन्हाळ्यात पुन्हा पेटण्याची चिन्हे आहेत.**



पुणे महापालिका आणि जलसंपदा विभाग यांच्यात पाण्यासाठी झालेल्या करारानुसार ११.५० अब्ज घनफूट (टीएमसी) पाण्याचा कोटा मंजूर केला आहे. मात्र, महापालिका मंजूर कोट्यापेक्षा अतिरिक्त साडेपाच ते आठ ‘टीएमसी’ पाणी वापरते. या अतिरिक्त पाण्यासाठी पालिकेला जलसंपदा विभागाने दंड केला आहे. मात्र, हा दंड पालिकेने भरलेला नाही.



### सचिवांकडून दखल

महापालिकेकडे आतापर्यंत ५४१ कोटी रुपयांची थकबाकी होती. त्यात चालू वर्षाची (२०२५-२६) १७३ कोटी ८५ लाख रुपयांची थकबाकी अद्याप भरली नसल्याने ७१४ कोटी रुपयांची नोटीस गेल्या महिन्यातच बजावली होती. महापालिकेने या नोटिशीला प्रतिसाद दिला नाही. जलसंपदा विभागाच्या सचिवांनी त्याची गंभीर दखल घेतली असून, ३१ मार्चपर्यंत ही थकबाकी भरण्याचा आदेश जलसंपदा विभागाने पुणे महापालिकेला दिला आहे. महापालिकेने थकबाकीची रक्कम जमा केल्यानंतरच धरणांच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येईल; अन्यथा दुरुस्ती करता येणार नसल्याचे जलसंपदा विभागाने स्पष्ट केले.

### सातत्याने वाद

जलसंपदा विभाग आणि पुणे महापालिका यांच्यातील थकबाकीचा हा वाद अनेक सुरू आहे. ‘जलसंपदा’कडून महापालिकेला पत्र येते, त्यानंतर पालकमंत्री त्यातून तोडगा काढतात; अथवा त्या स्तरावर हा प्रश्न मिटला नाही, तर जलसंपदामंत्र्यांकडे त्याबाबतचा निर्णय होतो. अवलंबून लोकसंख्येचा विचार करता, थकबाकी भरली नाही म्हणून पाणीकपातीचा निर्णय कोणी घेत नाही. त्यामुळे यासाठी दीर्घकालीन निर्णयाची गरज व्यक्त केली जात आहे. पुणे महापालिकेने येत्या २५ फेब्रुवारीपर्यंत थकबाकीची रक्कम जमा केली नाही, तर खडकवासला धरणातून पुण्याला केला जाणारा पाणीपुरवठा टप्प्याटप्प्याने कमी करण्यात येईल.

**- श्वेता कुऱ्हाडे,** कार्यकारी अभियंता, खडकवासला प्रकल्प

## पीएमपीएमएलच्या ताफ्यात एक हजार बस कधी ?

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत झाला निर्णय

। मावळ । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**शहरातील सार्वजनिक वाहतूक सक्षम करण्यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडच्या (पीएमपीएमएल) ताफ्यात एक हजार बस दाखल होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. यातील ५०० बस पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) तर पुणे महापालिका ३०० आणि पिंपरी-चिंचवड महापालिका २०० बस देणार आहेत. यामुळे पीएमपीने प्रवास करणाऱ्यांची सोय होणार आहे.**



गेल्या काही वर्षांमध्ये पुणे शहरासह पिंपरी-चिंचवड महापालिका तसेच पीएमआरडीएची हद्द वाढली आहे. वाढती लोकसंख्या लक्षात घेता सध्या पीएमपीकडे असलेल्या बस कमी पडत आहे. पीएमपीला सहा हजार बसची आवश्यकता आहे. मात्र, पीएमपीकडे केवळ दोन हजार बस उपलब्ध असून, त्यातील काही बस जुन्या झाल्याने दुरुस्तीसाठी जातात. यातील बहुतांश बस या खासगी ठेकेदारांच्या आहेत.शहराचा वाढत असलेला विस्तार आणि प्रवाशांची वाढत असलेली संख्या लक्षात घेत शहरातील सार्वजनिक वाहूतक व्यवस्था सक्षम करण्यासाठी पीएमपीला नव्याने एक हजार बस दिल्या जातील, अशी घोषणा राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केली होती.

या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत पीएमआरडीए, पुणे महापालिका, पिंपरी-चिंचवड महापालिका, पीएमपीएमएलचे अध्यक्षांची बैठक घेतली. या बैठकीत शहरासाठी तातडीने एक हजार बस खरेदी करण्याच्या सूचना देण्यात आल्या, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी ही माहिती दिली.पीएमपीला दिल्या जाणाऱ्या बसमध्ये ५०० बस या पीएमआरडीए कडून दिल्या जाणार आहेत. तर पुणे महापालिका ३०० आणि पिंपरी-चिंचवड महापालिका २०० बस देणार आहे. एका बसची किंमत ही ४८ लाख रुपयांपर्यंत असून, त्यानुसार यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची तयारी या बैठकीत तीनही संस्थांच्या प्रमुखांनी दाखविली आहे.

### 300 ते 350 बस सतत नादुरुस्त

या बस सीएनजीवरील असणार आहेत. पीएमपीला नव्याने बस मिळाल्यानंतर अनेक महत्त्वाच्या मार्गावरील फेऱ्यांमध्ये वाढ होईल. तसेच सध्या ३०० ते ३५० बस सतत नादुरुस्त होत असल्याने त्या ताफ्यातून काढाव्या लागणार आहेत, असेही अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज यांनी सांगितले.पीएमआरडीएच्या हद्दीत पीएमपी सेवा देत असल्याने पीएमपीला येत असलेल्या संचलानातील तुटीमध्ये पीएमआरडीने देखील हिस्सा उचलावा, अशी मागणी केली जात होती. दोन्ही महापालिकांनी याबाबत पीएमआरडीए कडे प्रस्ताव देखील ठेवला होता.

## चिंचवड मतदारसंघातील विकास कामांसाठी

# महापालिका अंदाजपत्रकात भरीव तरतूद करा!

### आमदार शंकर जगताप : आयुक्त शेखर सिंह यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक

| पिंपरी-चिंचवड |
महाईन्यूज | प्रतिनिधी |

**चिंचवड महापालिकेच्या आगामी अंदाजपत्रकात चिंचवड मतदारसंघातील विकास कामांचा समावेश करण्यासह भरीव निधीची तरतूद करण्यासंदर्भात आमदार शंकर जगताप आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांची आज (गुरुवारी) महत्त्वपूर्ण बैठक झाली.**



या बैठकीसाठी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, माजी महापौर माई ढोरे, माजी पक्षनेते नामदेव ढाके, माजी उपमहापौर तुषार हिंगे तसेच विशाल मासुळकर, चेतन घुले आणि सर्व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.या बैठकीत आमदार शंकर जगताप यांनी मागील काही वर्षांत वित्त आयोगाच्या नियमानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात विकास कामांसाठी अपेक्षित निधी उपलब्ध होत नसल्याची तक्रार केली. त्यांनी आगामी अर्थसंकल्पात चिंचवड मतदारसंघातील विकासकामांसाठी विशेष निधीची तरतूद करण्याची आग्रही मागणी केली.

**मुख्य मुद्दे आणि मागण्या..**

रस्ते आणि पायाभूत सुविधा:

-चिंचवड मतदारसंघात नवीन डीपी रोड विकसित करणे.

-वाढते नागरीकरण लक्षात घेता किवळे, रावेत, मामुर्डी, पुनावळे आणि वाकड परिसरात पायाभूत सुविधा विकसित करणे.

-विकास आराखड्यातील रस्त्यांसाठी निधीची तरतूद.

पर्यावरण आणि गृहनिर्माण:

-उद्याने व खेळाची मैदाने विकसित करावीत. ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र

-पीएमआय योजना अंतर्गत पुनावळे, रावेत आणि किवळे येथे परवडणाऱ्या घरांचे प्रकल्प मार्गी लावणे.-आरएमसी प्लांट्ससाठी पर्यावरण नियमावली बंधनकारक करणे आणि उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे.

**महानगरपालिकेतील रस्त्यांचा दर्जा सुधारणा:**

– शहरातील रस्त्यांच्या कामांची तपासणी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे यांच्या मार्फत करण्याचा निर्णय.

या सर्व मागण्यांसाठी महापालिका प्रशासनाने सकारात्मक पावले उचलावीत, अशी आमदार जगताप यांनी आग्रहाची मागणी केली. आयुक्त शेखर सिंह यांनी या प्रस्तावांचा गांभीर्याने विचार केला जाईल, असे आश्वासन दिले. येत्या अंदाजपत्रकात या विकासकामांसाठी आवश्यक निधीची तरतूद होण्याची अपेक्षा आहे.

**शिक्षण आणि पाणीपुरवठा:**

-रावेत गायरान भागात नवीन शाळेची इमारत उभारण्यास निधीची मागणी.

-मामुर्डी, रावेत आणि किवळे भागातील पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी नवीन पाणी टाक्या बांधण्यास निधी उपलब्ध करणे.

**शहर नियोजन आणि नागरी सुविधा**

-वाकड येथे वर्किंग वुमन होस्टेल प्रकल्पासाठी केंद्र सरकारच्या मदतीने निधी उपलब्ध करणे.

-काळेवाडी भागात रस्त्यांची कामे पूर्ण करणे.

-नव्याने विकसित भागांमध्ये मलनिस्सारण केंद्रे उभारण्यासाठी आवश्यक निधी राखीव ठेवणे.

-पिंपळे गुरव ते दापोडी नवीन पूल विकसित करण्यासाठी निधी उपलब्ध करणे.

-ताथवडे, रावेत, मामुर्डी आणि किवळे भागातील 'मिसिंग लिंक' रस्त्यांचे काम पूर्ण करणे.

---

## चिखलीत सहाव्या दिवशी ५५३ बांधकामांवर कारवाई

### महापालिकेची आढावा बैठक; सर्व विभागांनी समन्वयाने नियोजन करून अंमलबजावणी करावी

| पिंपरी-चिंचवड |
प्रतिनिधी | महाईन्यूज

**चिखली येथील कुदळवाडी भागात आरक्षित जागा आणि विकास रस्त्यांवर उभारण्यात आलेल्या अनधिकृत पत्राशेड, कारखाने, गोदामे, भंगार दुकाने तसेच अनधिकृत बांधकामांवर सलग सहाव्या दिवशीही निष्कासनाची कारवाई करण्यात आली. यामध्ये ५५३ बांधकामांचा समावेश आहे. १३४ एकर क्षेत्रफळामध्ये असलेल्या भूभागावरील सुमारे ५८ लाख चौरस फूट बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.**



महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह आणि पोलीस आयुक्त विनयकुमार चोबे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. यामध्ये अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम, उपआयुक्त मनोज लोणकर, पोलीस उपआयुक्त स्वप्ना गोरे, डॉ. शिवाजी पवार, बापू बांगर, विवेक पाटील, विशाल गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली या परिसरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. महापालिकेच्या आरक्षित जागा, विकास आराखड्यातील रस्त्यांवर असलेल्या अनधिकृत पत्राशेड, कारखाने, गोदाम, भंगार दुकाने या भागात असलेल्या अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात येत आहे. यापुढेही कारवाई सुरू राहणार आहे.

**यापुढेही कारवाई सुरु**

या कारवाईमध्ये महापालिका अतिक्रमण धडक कारवाई पथकामधील ४ कार्यकारी अभियंते, १६ उपअभियंते, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे १८० जवान, ६०० पोलीस आणि मजूर कर्मचारी सहभागी झाले आहेत. ४४ पोकलेन, ८ जेसीबी, १ क्रेन आणि ४ कटर यांचा वापर निष्कासन कारवाईमध्ये करण्यात आला. ३ अग्निशमन वाहने आणि २ रुग्णवाहिका येथे तैनात करण्यात आल्या आहेत. महापालिका यंत्रणेसह पोलीस, वीज वितरण कंपनीचे अधिकारी कर्मचारी देखील कारवाईमध्ये सहभागी झाले आहेत.



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# राजकारण पोखरणारी कीड, Voice of UBT ची चीड!



**एकनाथ शिंदे मूळ शिवसेनेतून बाहेर पडल्यानंतर शिल्लक सेनेला म्हणजे उबाठा गटाला लागलेली घरघर थांबायचे काही नाव घेत नाही ! बहुतेक ही शिल्लक सेना संपवण्याचा विडा त्यांचे प्रवक्ते आणि Voice of UBT म्हणजेच संजय राऊत यांनी उचलला आहे की काय, अशी त्यामुळेच शंका येऊन जाते. संजय राऊत यांच्या या बाष्कळ बडबडीमुळे वंदनीय बाळासाहेबांच्या मूळ शिवसेनेचे किती नुकसान झाले, याकडे पाहण्यासाठी उद्धव ठाकरेंकडे वेळ नसावा, किंवा संजय राऊत यांच्या प्रत्येक शब्दाला त्यांचा पाठिंबा असावा, हे आता लपून राहिलेले नाही.**

## रोज ऊठ शिव्या देत सूट..

संजय राऊत यांच्यासारख्या प्रचंड 'कर्तृत्ववान' नेत्याने मूळ शिवसेना संपवली, त्यांची महाविकास आघाडी संपवली आणि आता देशातील 'इंडी' आघाडीकडे त्याची वक्रदृष्टी गेली आहे. एकेकाचे कट्टर शिवसैनिक राजन साळवी यांनी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केल्यामुळे संतापलेल्या संजय राऊत यांची जीभ घसरली.( तशी ती हल्ली रोजच घसरत असते) ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी एकनाथ शिंदेंचा सत्कार केल्याबद्दल त्यांनी प्रचंड आदळ आपट केली. पण, हल्ली हे रोजचंच झालं आहे. त्यामुळे त्यांच्या वक्तृत्वाची दखल फारसं कोणी घेत असेल असं वाटत नाही !

## इतरांसाठी दुर्लक्ष करण्यासारखाच विषय

संजय राऊत यांचे वक्तव्य आणि त्यावर प्रतिक्रिया हा खरंतर दुर्लक्ष करण्याजोगा विषय. मात्र, दररोज सकाळी आयुष्यातली वीस-पंचवीस मिनिटं हे गृहस्थ वाया घालवत असल्याने कधीतरी फावल्या वेळात त्यांच्यावर नाईलाजाने, अनिच्छेने लिहावेच लागते. संजय राऊत यांचे बोलणे उद्धव ठाकरे आणि त्यांचा परिवार वगळता कोणी मनावर घेत असेल, असे वाटत नाही. असे म्हणण्याचे कारण संजय राऊत शंभर वाक्य बोलत असतील तर त्यातील ४० वाक्ये उद्धव ठाकरे आणि परिवाराची असू शकतात.

## दोघांच्या बोलण्यातील साम्य स्थळे

उद्धव ठाकरे यांचे भाषण आणि संजय राऊत यांची पत्रकार परिषद चुकून कधी ऐकली तर या दोघांच्या बोलण्यातील साम्य स्थळे चटकन लक्षात येतात. शैली समजते, यावरून हा निष्कर्ष काढला आहे. या शिवाय त्यांच्यात नसलेली तर्कशुद्धता, बऱ्याचदा अभ्यासाचा अभाव, तेच ते बोलण्याचा मनापासून बांधलेला चंग, आपण कधी काय बोललो याचे त्यांचे पक्के असलेले विस्मरण.. या साम्य स्थळांमुळे उद्धव ठाकरे आणि संजय राऊत रुपयातले ४०-६० टक्के भागीदारी असणाऱ्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे लक्षात येते.

उद्धव ठाकरे यांची फूस असणारच संजय राऊत यांनी (ठाकरे यांच्या सांगण्यावरून) आज चक्क राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावरच थेट नाराजी व्यक्त करत, शरद पवार यांनी एकनाथ शिंदे यांचा दिल्लीत जो सत्कार केला, त्यावर आक्षेप नोंदवला आहे. ज्या शरद पवारांमुळे संजय राऊत यांचे आका उद्धव ठाकरे यांना घोड्याच्या चालीच्या वर्षांचे मंत्रीपद मिळाले, त्यांच्या प्रति असणारी आदराची भावना संपुष्टात आल्याचे त्यांच्या वक्तव्यावरून स्पष्ट होत आहे. साहित्य संमेलन दलाल भरवतात असे म्हणत त्यांनी स्वागताध्यक्ष असणाऱ्या शरद पवार यांच्यावर तोफ डागली. शरद पवार हे संमेलनाचे स्वागताध्यक्ष आहेत. साहित्य संमेलनाच्या नियोजनात किंवा संमेलनाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आणण्याच्या प्रयत्नात शरद पवार यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, हे संजय राऊत विसरले का?

## दररोजचे अर्थशून्य बोलणे

साहजिकच आपल्या दररोजच्या अर्थशून्य बोलण्यामध्ये साहित्य संमेलन, शरद पवार, एकनाथ शिंदे या सगळ्यांना गुंडाळणे योग्य नव्हते. शरद पवार यांनी केलेल्या जोडणीमुळे काँग्रेस व शिवसेना एकत्र येऊन महाआघाडी झाली होती, हे राहुल गांधी आणि उद्धव ठाकरे दोघेही मान्य करतील.

## अजूनही ताकद दाखवू शकतात

एकनाथ शिंदे व भारतीय जनता पक्ष यांचा संजय राऊत यांना एवढा राग आहे तर तो काढण्याची, ठाकरे गटाला आपली ताकद दाखवण्याची संधी त्यांना होती. आजही आघाडीतून बाहेर पडत दोन्ही पवार, शिंदे, शक्य असेल तर कॉंग्रेस व भाजपवर त्यांनी राग व्यक्त करावा. मात्र, ती संधी त्यांनी दवडली.संधीचे सोने करण्याची त्यांच्यात धमक नाही, हेच खरे! आज या सर्व प्रकरणावरून मंत्री शंभूराज देसाई यांनी संजय राऊत यांना त्यांच्या पवार यांच्यावरील टीके संदर्भात कडक शब्दात थेट आव्हान दिले आहे. जर ठाकरे यांच्या गटात धमक असेल तर महाआघाडीतून बाहेर पडून दाखवा, असे तगडा पर्याय वजा आव्हानही त्यांना दिले आहे. संजय राऊत हे आव्हान स्वीकारतील असे वाटत नाही.

## हे कसले कडवे शिवसैनिक?

संजय राऊत यांच्यापेक्षाही शंभूराज देसाई हे कडवे शिवसैनिक आहेत. मतदारांमध्ये आणि मतदार संघात जाऊन स्वतःच्या ताकदीवर निवडणूक लढण्याची आणि ते जिंकण्याची, पराभव झाला तेव्हा तो पचवण्याची ताकद त्यांच्यात आहे. शंभुराज हे विधानसभेने गौरवलेले उत्तम लोकप्रतिनिधी आहेत आणि एकनाथ शिंदे तसेच देवेंद्र फडणवीस यांचेही विश्वासू आहेत. आज राज्यात फडणवीस, शिंदे, पवार यांचेच नाणे चालते. तेव्हा संजय राऊत यांनी या सगळ्याचा विचार करून आपल्या आकाची क्षमता लक्षात घेऊन महायुती आणि अगदी शरद पवार यांनाही डिवचण्याचे धाडस करावे, असे वाटते.

ज्या मंडळींना ते व त्यांचे आका गद्दार म्हणून संबोधतात त्यांच्याच मतावर राज्यसभेत आपण निवडून आलो आहोत, हे राऊत यांनी विसरू नये आणि त्याच मंडळींच्या कृपेने उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले, हेही लक्षात ठेवावे. महाआघाडीतून बाहेर पडायचे असेल तर मतभेद असल्याचे स्पष्ट करून महाआघाडीला रामराम ठोकावा. मात्र, सांगता येत नाही आणि सहन होत नाही अशी परिस्थिती आपली आपण ओढवून घेतल्यावर वाचाळपणाशिवाय राऊत यांच्या हातात, नव्हे तोंडात काही शिल्लक राहत नाही. शंभूराज यांच्या आव्हानाला राऊत यांच्याकडे उत्तर नाही. मात्र सर्व कला पारंगत असणाऱ्या राऊतांना 'मन की बात' शरद पवारांना बोलल्याबद्दल धन्यवाद द्यावे अशीच अवस्था आहे. संजय राऊत यांच्या तोडून उद्धव ठाकरे बोलले आहेत, हे नक्की समजून घ्यावे!

■■■

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मराठ्यांच्या काळजावर वार केला!

## सुरेश धस-धनंजय मुंडे भेटीवर जरांगेंची संतप्त प्रतिक्रिया

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी सातत्याने उचलून धरले आहे. या गुन्ह्यात आरोपींना कठोर शिक्षा व्हावी यासाठी त्यांच्याकडून प्रशासनावर दबाव टाकला जात आहे. यादरम्यान सुरेश धस यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेतल्याची माहिती समोर आल्यानंतर राजकीय वर्तुळातून वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्या जात आहेत.**



### मराठ्यांनी कोणाकडे न्याय मागायचा?

माझा विश्वासच बसत नाही आणि गेले असतील तर हे दुर्दैव आहे. त्यांच्या इतका विश्वासघातकी या पृथ्वीतलावर कोणी जन्मू शकत नाही, अशी भावना मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केली आहे.ज्या लोकांनी टीका केली, ज्या लोकांनी यांची राजकीय कारकीर्द बरबाद करायचं असं ठरवलं, असं तेच म्हणाले. यांनी तिथंच भेटायला जाणं... आपली माणसं मारून टाकणाऱ्याचं का तोंड बघायचं? इतक्या क्रूर माणसाला तुम्ही भेटायला जाता, ज्याच्या लोकांनी खून घडवून आणला, त्यांना एकदाही देशमुख कुटुंबाकडे यावं नाही वाटलं? तुम्हाला भेटायला जाण्याइतकी का माया फुटली, ते काय कोमामध्ये आहेत का? इतक्या क्रूर माणसाला भेटायला जाता तर मग गोरगरीब मराठ्यांनी कोणाकडे न्याय मागायचा?

यादरम्यान मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी देखील प्रतिक्रिया देत संताप व्यक्त केला आहे. ते भेटायला गेले असतील यावर माझा विश्वासच बसत नाही आणि गेले असतील तर हे दुर्दैव आहे. त्यांच्या इतका विश्वासघातकी या पृथ्वीतलावर कोणी जन्मू शकत नाही, अशी भावना मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केली आहे. ज्या लोकांनी टीका केली, ज्या लोकांनी यांची राजकीय कारकीर्द बरबाद करायचं असं ठरवलं, असं तेच म्हणाले. यांनी तिथंच भेटायला जाणं... आपली माणसं मारून टाकणाऱ्याचं का तोंड बघायचं? इतक्या क्रूर माणसाला तुम्ही भेटायला जाता, ज्याच्या लोकांनी खून घडवून आणला, त्यांना एकदाही देशमुख कुटुंबाकडे यावं नाही वाटलं? तुम्हाला भेटायला जाण्याइतकी का माया फुटली, ते काय कोमामध्ये आहेत का? इतक्या क्रूर माणसाला भेटायला जाता तर मग गोरगरीब मराठ्यांनी कोणाकडे न्याय मागायचा? देशमुख कुटुंब उन्हात पडलं आहे, तुम्ही झोपेत आहात का? तुमच्या राजकारणासाठी, एखाद्या पदासाठी, तुमच्या स्वार्थासाठी तुम्ही इकडे तिकडे फिरता. नाहीतर मग यामध्ये यायचं नाही... इकडं समाजाकडून वाहवा करून घ्यायला पाहिजे, समाजाचा हात पाठीवर पाहिजे... आणि राजकारण पण करायचं... कोणतं तरी एकच काहीतरी करावं ... इथं बाकिचे नाहीत का? मोठेपण घ्यायची, सन्मान घ्यायची हाव तर खूप आहे, मग शेवट होईपर्यंत मान तुटेपर्यंत लढायचं देखील, असेही मनोज जरांगे यांनी यावेळी सुनावले .त्यांनी माणसं कापून टाकली आहेत, त्यांना भेटायला जाता? मराठ्यांनी तुमच्यावर विश्वास टाकला. गोरगरीब मराठ्यांच्या पोरांच्या तोंडात माती कालवता का? काळीज कापून नेणारा हा पहिलाच पृथ्वीतलावरील माणूस असू शकतो. ज्यांनी क्रूर हत्या केली, देशमुखांचं कुटुंब उघड्यावरती पाडलं, त्या क्रूरकर्म्याला भेटायला जातात म्हणजे हे प्रकरण शंभर टक्के षडयंत्रामध्ये गुंतलं आहे. यांना आरोपी सोडून द्यायचे आहेत. चार्जशीट फोडायचं आहे. हे प्रकरण यांना पूर्ण दाबून टाकायचं आहे, असेही मनोज जरांगे म्हणाले."जसं खून करणाऱ्यापेक्षा आणि खंडणी मागणाऱ्यापेक्षा सामूहिक कट रचून जो घडवून आणतो तो दोषी असतो ना, तसं एकही आरोपी सुटला तर सकारपेक्षा जास्त धस दोषी राहणार आहेत. जे फडणवीस यांनी केलं नाही ते धस यांनी केलं. या सरकारला मराठ्यांचा तिरस्कार आहे. यांना फक्त मराठ्यांच्याच हाताने मराठ्यांवर वार करायचे होते. जर सुरेश धस भेटले असतील तर शंभर टक्के गोरगरीब मराठ्यांच्या काळजावर त्यांनी वार केला आहे," असेही मनोज जरांगे यावेळी बोलताना म्हणाले. मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी देखील प्रतिक्रिया देत संताप व्यक्त केला आहे.

---

# एसटी डेपो विमानतळाप्रमाणे चकाकणार?

## 3,360 एकर जागा विकसित करण्यासाठी खासगी बिल्डर्सना आमंत्रण

। अहिल्यानगर ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्यात एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात प्रवास करण्यासाठी एसटी हे मुख्य साधन आहे. राज्यात शेकडो एसटी बस आगार असून त्यांची हजारो एकर जमीन आहे. आता राज्य सरकारकडून पीपीपी मॉडेलचा आधार घेत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या३,३६० एकर जमिनीवर खासगी बिल्डर्सच्या माध्यमातून विकास करण्यासाठी आमंत्रित केले जाणार आहे. यासाठी राज्य सरकार लवकरच १५० निविदा काढणार आहे, अशी माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. मुंबई येथे आयोजित केलेल्या २०२५ मध्ये बोलत असताना त्यांनी ही घोषणा केली.**



### 100 खाटांचे हॉस्पिटल बांधले जाईल

वास्तुविशारद हाफिज कॉन्ट्रॅक्टर यांच्या सहकार्यातून एसटी डेपोंचा विमानतळाच्या धरतीवर विकास केला जाईल." एसटी डेपोच्या विकासाची रूपरेषा सादर करण्यासाठी सरकारने वास्तुविशारद हाफिज कॉन्ट्रॅक्टर यांची नियुक्ती केली आहे. विकासाची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी एमएसआरटीसी विकास योजनांना केंद्रीय पातळीवर मंजुरी देईल. ज्यामुळे शासनाच्या विविध यंत्रणाकडून परवानग्या मिळविण्यातला वेळ वाचेल. याशिवाय विकास प्रकल्पांवर देखरेख ठेवण्यासाठी एसटी महामंडळ आपल्या तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या क्षमताही वाढविण्याच्या विचारात आहे.राज्यात एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात प्रवास करण्यासाठी एसटी हे मुख्य साधन आहे.

मुंबई महानगर क्षेत्रातील मुंबई सेंट्रल, कुर्ला, विद्याविहार आणि चिंचबंदर येथील मोक्याच्या ठिकाणी एमएसआरटीसीच्या ताब्यात २६ एकरची जमीन आहे. याशिवाय पुण्यातील स्वारगेट आणि सांगवी येथे २४ एकरची जागा आहे. हे दोन महानगर वगळता महामंडळाकडे जिल्हा स्तरावर ८८५ एकर, तालुका स्तरावर १,५३५ एकर आणि गाव पातळीवर ९४५ एकर जमीन आहे.प्रीमियमच्या आधारावर प्रकल्पांचे वाटप केले जाईल, तसेच 'एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली' (यूडीसीपीआर) अंतर्गत विकासकांना एफएसआय दिला जाईल. या प्रकल्पातील व्यावसायिक गाळे भाड्याने देण्याची जबाबदारी विकासकाची असेल. या प्रकल्पानुसार, कार्यालये, हॉटेल, शॉपिंग सेंटर आणि दुकान गाळ्यांचे बांधकाम केले जाईल. जिल्हा स्तरावर विकास करताना १०० खाटांचे हॉस्पिटल बांधले जाईल. तसेच महामंडळाच्या कामासाठीही सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.प्रताप सरनाईक यावेळी तरुण बांधकाम व्यावसायिकांना संबोधित करताना म्हणाले, "एसटी डेपोमध्ये प्रवाशी आणि कर्मचारी यांना चांगल्या सोयी-सुविधा देण्याचा आमचा प्रयत्न आहे. स्वच्छ शौचालय, महिलांसाठी प्रसाधनगृहे आणि रात्रपाळीच्या कर्मचाऱ्यांसाठी राहण्याची सुविधा दिली जाईल. नियोजन प्राधिकरण म्हणून परिवहन खाते या प्रकल्पांवर देखरेख ठेवेल.

# मनी लॉंडरिंग गंभीर गुन्हा!

## सर्वोच्च न्यायालयाने केली महत्वपूर्ण टिप्पणी

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मनी लॉंडरिंगचा प्रकार देशाच्या आर्थिक व्यवस्थेसाठी, सार्वभौमत्वासाठी आणि अखंडतेसाठी धोका असल्याची महत्वाची टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली आहे. हा सामान्य गुन्हा नाही तर हा एक गंभीर गुन्हा आहे असेही न्यायालयाने म्हटले आहे. मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायद्याचा (पीएमएलए) उद्देश मनी लॉंडरिंग थांबवणे आहे, जो देशाच्या आर्थिक व्यवस्थेसाठी धोका आहे.**

मनी लॉंडरिंग हा एक गंभीर गुन्हा आहे ज्यामध्ये एखादी व्यक्ती स्वतःचा नफा वाढवण्यासाठी राष्ट्रीय आणि सामाजिक हितांकडे दुर्लक्ष करते. या गुन्ह्याला कोणत्याही प्रकारे क्षुल्लक स्वरूपाचा गुन्हा म्हणता येणार नाही असे नमूद करतानाच सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, हा कायदा मनी लॉंडरिंगच्या कारवायांना तोंड देण्यासाठी बनवण्यात आला आहे.
यामध्ये मनी लॉंडरिंगच्या अशा कृत्यांचा समावेश आहे ज्यांचा आर्थिक व्यवस्थेवर आंतरराष्ट्रीय परिणाम होतो, ज्यामुळे देशांच्या सार्वभौमत्वावर आणि अखंडतेवर देखील परिणाम होतो.जगभरात मनी लॉंडरिंग हा एक गंभीर गुन्हा मानला जातो. यामध्ये सहभागी असलेले गुन्हेगार सामान्य गुन्हेगारांपेक्षा वेगळ्या वर्गाचे मानले जातात. मनी लॉंडरिंगमध्ये सहभागी असलेल्या गुन्हेगाराच्या गुन्ह्याचे गांभीर्य आणि पीएमएलएच्या कलम ४५ च्या कडक तरतुदींचा विचार न करता न्यायालये जामीन मंजूर करण्याचे समर्थन करू शकत नाहीत, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. आरोपींच्या जामीन अर्जावर निर्णय घेताना मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायद्यात घालून दिलेल्या दुहेरी अटींचा विचार करणे अत्यावश्यक आहे. पीएमएलएच्या कलम ४५ च्या दुहेरी अटींनुसार, सरकारी वकिलांना जामीन अर्जाला विरोध करण्याची संधी दिली पाहिजे. यासोबतच, न्यायालयाने हे सुनिश्चित करावे की आरोपी गुन्ह्यात दोषी नाही आणि जामिनावर तो कोणताही गुन्हा करणार नाही असे मानण्यास वाजवी आधार आहे. या निरीक्षणांसह, न्यायमूर्ती बेला एम त्रिवेदी आणि प्रसन्ना बी. यांनी मनी लॉंडरिंगचा आरोप असलेल्या कन्हैया प्रसादला जामीन देण्याचा पाटणा उच्च न्यायालयाचा आदेश फेटाळून लावला आहे. न्यायालयाने कन्हैया प्रसादला एका आठवड्यात आत्मसमर्पण करण्याचे आदेश दिले आहेत.मनी लॉंडरिंगचा प्रकार देशाच्या आर्थिक व्यवस्थेसाठी, सार्वभौमत्वासाठी आणि अखंडतेसाठी धोका असल्याची महत्वाची टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली आहे. हा सामान्य गुन्हा नाही तर हा एक गंभीर गुन्हा आहे असेही न्यायालयाने म्हटले आहे. मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायद्याचा (पीएमएलए) उद्देश मनी लॉंडरिंग थांबवणे आहे, जो देशाच्या आर्थिक व्यवस्थेसाठी धोका आहे.



### आरोपी गुन्ह्यात दोषी नाही

मनी लॉंडरिंग हा एक गंभीर गुन्हा आहे ज्यामध्ये एखादी व्यक्ती स्वतःचा नफा वाढवण्यासाठी राष्ट्रीय आणि सामाजिक हितांकडे दुर्लक्ष करते. या गुन्ह्याला कोणत्याही प्रकारे क्षुल्लक स्वरूपाचा गुन्हा म्हणता येणार नाही असे नमूद करतानाच सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, हा कायदा मनी लॉंडरिंगच्या कारवायांना तोंड देण्यासाठी बनवण्यात आला आहे. यामध्ये मनी लॉंडरिंगच्या अशा कृत्यांचा समावेश आहे ज्यांचा आर्थिक व्यवस्थेवर आंतरराष्ट्रीय परिणाम होतो, ज्यामुळे देशांच्या सार्वभौमत्वावर आणि अखंडतेवर देखील परिणाम होतो.जगभरात मनी लॉंडरिंग हा एक गंभीर गुन्हा मानला जातो. यामध्ये सहभागी असलेले गुन्हेगार सामान्य गुन्हेगारांपेक्षा वेगळ्या वर्गाचे मानले जातात.

# महात्मा गांधींचा फोटो रशियन बिअर कॅनवर

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।





एका रशियन बिअर ब्रॅंडने त्यांच्या कॅनवर महात्मा गांधींचा फोटो लावल्याचा प्रकार समोर आला आहे. यानंतर सोशल मीडियावर प्रकरणी प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे. ओडिशातील सामाजिक-राजकीय नेते सुपर्णो सत्पथी यांनी गांधीजींचा फोटो असलेल्या रिवोर्ट बियर (REWORT BEER) कॅनचे फोटो सोशल मीडियावर शेअर केल्यानंतर वाद पेटला आहे. या प्रकरणी कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. सोशल मीडियावर पोस्ट करत सत्पथी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना या प्रकरणी हस्तक्षेप करण्याची आणि रशियन अधिकाऱ्यांशी चर्चा करून हा मुद्दा निकाली काढला जावा अशी मागणी केली आहे.
भारताचे राष्ट्रपिता म्हणून महात्मा गांधी यांचा जगभरात सन्मान केला जातो, मात्र त्यांचा फोटो वापरून बिअरची विक्री होत असल्याचा प्रकार समोर आल्याने संताप व्यक्त केला जात आहे. हा मुद्दा सत्पथी यांनी निदर्शनास आणून दिला आहे. त्यांनी एक्सवर या बिअर कॅन्सचे फोटो शेअर कले आहेत. "माझी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना नम्र विनंती आहे की त्यांनी हा मुद्दा त्यांचे मित्र @KREMLINRUSSIA_E समोर मांडावा. रशियाची रिवोर्ट ही गांधीजींचे नाव वापरून बिअरची विक्री करत असल्याचे दिसून आले आहे...," असे सत्पथी यांनी आपल्या या पोस्टच्या कॅप्शनमध्ये म्हटले आहे.बिअर कॅनचे फोटो ऑनलाइन व्हायरल झाले आहेत. यानंतर अनेकांनी सोशल मीडियावर या ब्रॅंडवर टीका करण्यास सुरूवात केली आहे. अनेक वापरकर्त्यांनी ही अपमानजनक असल्याचे म्हटले आहे. अनेकांनी हा प्रकार म्हणजे भारताचा अपमान असल्याचे म्हटले आहे. अनेकांनी यासाठी कंपनीवर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी केली आहे. या वादावर रिवोर्ट यांच्याकडून मात्र अद्याप कोणतीही प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. एका रशियन बिअर ब्रॅंडने त्यांच्या कॅनवर महात्मा गांधींचा फोटो लावल्याचा प्रकार समोर आला.

# मी अभ्यासात खूपच साधारण होतो

## गौतम अदानींची 12वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी खास पोस्ट

। प्रयागराज ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अभियांत्रिकी प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षा जेईई मेन्सचा निकाल मंगळवारी जाहीर झाला. यानंतर उत्तर प्रदेशमधील गोरखपूर येथे जेईई परीक्षेत नापास झालेल्या १८ वर्षीय मुलीने आत्महत्या केल्याची घटना समोर आली होती. आत्महत्या करण्यापूर्वी या मुलीने आपल्या आई-वडीलांसाठी एक चिठ्ठी लिहिली होती, ज्यामध्ये तिने त्यांची माफी मागितली होती.**




ही घटना समोर आल्यानंतर मोठ्या प्रमाणात हळहळ व्यक्त केली जात आहे. गौतम अदानी यांनी देखील या घटनेची दखल घेत सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर विद्यार्थ्यांसाठी एक खास पोस्ट केली आहे.उद्योगपती गौतम अदाणी यांनी विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांसाठी लिहिलेल्या या संदेशात मुलीच्या आत्महत्येबद्दल शोक व्यक्त केला आहे. तसेच त्यांनी आपण देखील शालेय जीवनात खूप हुशार विद्यार्थी नव्हतो असेही गौतम अदाणी म्हणाले आहेत. त्यांच्या सोशल मीडियावर केलल्या पोस्टमध्ये अदाणी यांनी लिहिले की, "अपेक्षांच्या ओझ्याखाली दबल्याने एक हुशार मुलगी निघून जाणे हृदय पिळवटून टाकणारे आहे. आयुष्य हे कोणत्याही परीक्षेपेक्षा मोठं असतं- ही गोष्ट पालकांनी लक्षात घेणे आवश्यक आहे आणि त्यांनी ती मुलांनादेखील समजावून सांगणे गरजेचे आहे. मी अभ्यासात खूपच साधारण होतो. अभ्यास आणि आयुष्य यामध्ये मी अनेक वेळा अपयशी झालो, मात्र प्रत्येकवेळी जीवनाने नवीन मार्ग दाखवला. माझी तुम्हा सर्वांना फक्त इतकीच विनंती आहे की, अपयशाला कधीही शेवट समजू नका.

### विद्यार्थ्यांनीची सुसाइड नोट

उत्तर प्रदेशातील गोरखपूरमध्ये जॉइंट एन्ट्रन्स एक्झामिनेशन (जेईई) मेन २०२५ मध्ये कमी गुण मिळाल्याने निराश झालेल्या १२ वीच्या एका विद्यार्थीने आत्महत्या केली. आत्महत्येच्या आधी लिहिलेल्या चिठ्ठीत तिने आधी पालकांची माफी मागितली त्यानंतर गळफास घेऊन आत्महत्या केली होती. तिच्या खोलीत तिने लिहिलेली सुसाईड नोट सापडली ज्यामध्ये तिने लिहिलं की, "आई आणि बाबा मला माफ करा. तुमची इच्छा मी पूर्ण करू शकले नाही. आपला एकत्र प्रवास इथेच संपतो आहे. आता रडू नका. तुम्ही दोघांनी मला अपार प्रेम दिले.

# प्रतीक बब्बरने लग्नात वडिलांनाही बोलावलं नाही

दिवंगत स्मिता पाटील व ज्येष्ठ अभिनेते राज बब्बर यांचा मुलगा अभिनेता प्रतीक बब्बर यांने दुसरं लग्न केलं आहे. प्रतीक त्याची गर्लफ्रेंड प्रिया बॅनर्जीबरोबर लग्नबंधनात अडकला. त्याच्या लग्नाचे फोटो व व्हिडीओ समोर आले आहेत. प्रतीकने मोठ्या थाटामाटात लग्नगाठ बांधली, पण त्याने कुटुंबियांना आमंत्रित केलं नाही. प्रतीक बब्बर आणि अभिनेत्री प्रिया बॅनर्जी आज व्हॅलेंटाइन डेला वाहबंधनात अडकले. प्रतीकचा सावत्र भाऊ अभिनेता आर्य बब्बर याने सांगितलं की, बब्बर कुटुंबातील कोणालाही प्रतीकने लग्नाचे निमंत्रण दिलेले नाही. प्रतीकने त्याचे वडील राज बब्बर यांनाही आमंत्रित केलं नाही.



आर्यने यासाठी प्रतीकला दोष दिला नाही, तर त्याला कोणतरी कुटुंबाविरोधात भडकवत आहे, असं त्याने म्हटलंय.ई-टाइम्सला दिलेल्या मुलाखतीत आर्यने प्रतीकच्या लग्नाबद्दल प्रतिक्रिया दिली. "मला वाटतं कोणीतरी त्याला कुटुंबाविरोधात केलं आहे. त्याला आमच्या कुटुंबातील कोणाच्याही संपर्कात राहायचं नाही. त्याने कोणाला फोन केला नाही," असं आर्य म्हणाला. प्रतीकची सावत्र आई नादिरा बब्बर यांना न बोलवणं समजू शकतो, पण किमान त्याने वडील राज बब्बर यांना आमंत्रित करायला हवं होतं, असं आर्य म्हणाला. "आमचं आयुष्य हे चित्रपटापेक्षा कमी नाही, कोणाच्या तरी प्रभावामुळे तो असं करत आहे; कारण प्रतीक असा नाही," असं आर्यने नमूद केलं.प्रतीक हा राज बब्बर आणि स्मिता पाटील यांचा मुलगा आहे. स्मिता पाटील या राज बब्बरच्या दुसऱ्या पत्नी होत्या, राज यांचे पहिले लग्न नादिरा बब्बरशी झाले होते. आर्य बब्बर आणि जुही बब्बर अशी दोन अपत्ये आहेत.राज बब्बर त्यांची को-स्टार स्मिता पाटीलच्या प्रेमात पडले आणि दोघांनी १९८३ मध्ये लग्न केले. या जोडप्याने त्यांचा मुलगा प्रतीकचे स्वागत केले.

# दिव्याचा पार पडला साखरपुडा



'लक्ष्मी निवास' ही 'झी मराठी'वरील मालिका सध्या चांगलीच चर्चेत आहे. या मालिकेत जान्हवीची भूमिका अभिनेत्री दिव्या पुगावकर साकारत आहे. काही दिवसांपूर्वीच मालिकेत जान्हवी आणि जयंत यांचा भव्यदिव्य लग्नसोहळा पाहायला मिळाला होता. मात्र, आता जान्हवीची भूमिका साकारणारी दिव्या खऱ्या आयुष्यात नव्या प्रवासाला सुरुवात करत आहे. दिव्या पुगावकरच्या घरी सध्या लगीनघाई सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. नुकतेच तिच्या मेहंदी सोहळ्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. आता अभिनेत्रीचा साखरपुडा पार पडल्याची माहिती समोर येत आहे. दिव्याने साखरपुड्यात मराठमोळा लूक केल्याचं फोटोंमध्ये पाहायला मिळत आहे.हिरव्या रंगाची सुंदर अशी साडी, हातात हिरवा चुडा, गळ्यात साडीवर शोभेल असा नेकलेस, केसात गजरा असा पारंपरिक लूक दिव्याने साखरपुड्यात केला होता. अभिनेत्रीने साखरपुड्यात आपल्या होणाऱ्या नवऱ्यासह सुंदर असं फोटोशूट देखील केलं.दिव्याच्या होणाऱ्या नवऱ्याचं नाव अक्षय घरत असं आहे.

# ठरलं तर मग : सायली-अर्जुनची हकालपट्टी!

'ठरलं तर मग' मालिकेत सध्या प्रतिमाने पुढाकार घेऊन अर्जुन-सायलीचं लग्न लावून दिल्याचा सीक्वेन्स चालू आहे. सुरुवातीला अर्जुन आणि प्रियाचं लग्न होत असताना अचानक लग्नात बॅण्डवाल्याच्या रुपात सायली एन्ट्री घेते. "माझ्या नवऱ्याशी काहीही झालं तरी मीच लग्न करणार" असं सायली प्रियाला ठणकावून सांगते. यावेळी सायलीला खंबीरपणे साथ देते ती प्रतिमा... अर्जुन सुद्धा बायकोच्या बाजूने उभा राहून प्रियाला खडेबोल सुनावतो. सायली लग्नाच्या मंडपात आल्यावर प्रतिमा पूर्णा आजीला वचन मागे घ्यायला भाग पाडते. या सगळ्या गोष्टी पाहून प्रिया प्रचंड संतापते आणि सायलीला उलटं बोलू लागते. इतकंच नव्हे तर, प्रिया सायलीबद्दल भर मांडवात आक्षेपार्ह शब्द वापरते. प्रियाचं हे रुप पाहून प्रतिमा संतापून तिला कानाखाली वाजवते. तसेच यापुढे, "सायलीबद्दल एकही अपशब्द बोलू नकोस, असं करून तू स्वत:ची लायकी दाखवत आहेस"



असंही ती प्रियाला बजावते. "सायली देखील माझ्या मुलीसारखी आहे, तिने माझ्यासाठी जे काही केलंय ते खूप मोठं आहे" असं बोलून प्रतिमा सर्वांची समजूत काढते आणि अर्जुन-सायलीचं लग्न लावून देते.लेकीचं कन्यादान करण्यासाठी मधुभाऊ यावेळी मांडवात येतात. आपल्या लेकीचा हात ते अर्जुनच्या हाती सुपूर्द करतात. मिसेस सायलीशी पुन्हा एकदा लग्न होणार... या विचाराने अर्जुन खूपच सुखावतो. तो गुरुजींना पुन्हा एकदा नव्याने सगळे विधी सुरू करा असं सांगतो. मालिकेत खरा ट्विस्ट अर्जुन-सायलीच्या लग्नानंतर येणार आहे.अर्जुन आणि सायली लग्नानंतर सुभेदारांच्या घरी जातात. याठिकाणी सुनेचं स्वागत न करता दोघांचीही हकालपट्टी करण्याची तयारी सुरू असते. अर्जुन-सायली गाडीतून उतरून सुभेदारांच्या पूर्णानिवासच्या प्रवेशद्वाराजवळ उभे राहतात. यावेळी प्रताप दोघांनाही घराबाहेर काढतो. सायलीचं सामान घराबाहेर फेकलं जातं. सायली आणि अर्जुनचं लग्न सुभेदार कुटुंबीय स्वीकारत नाहीत."आम्हाला या मुलीशी कोणताही संबंध जोडायचा नाहीये. हा निर्णय आम्ही सर्वांनी मिळून घेतला आहे. सायलीला या घरात प्रवेश मिळणार नाही." असं प्रताप अर्जुनला सांगतो.

# 'शिवा'फेम शाल्व किंजवडेकरचे वक्तव्य चर्चेत

शिवा' ही मालिका लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचलेली आहे. या मालिकेत आशू ही प्रमुख भूमिका साकारणारा अभिनेता शाल्व किंजवडेक घराघरांत पोहोचला आहे. मालिकेबरोबरच अभिनेता त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळेदेखील मोठ्या चर्चेत आहे. शाल्वचे काही दिवसांपूर्वीच लग्न झाले आहे. श्रेया डफळापूरकर असे त्याच्या पत्नीचे नाव आहे. सहा वर्षे लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहिल्यानंतर त्यांनी लग्नगाठ बांधली आहे. आता मात्र अभिनेत्याने एका मुलाखतीत केलेले वक्तव्य चर्चेचा विषय ठरत आहे.शाल्व किंजवडेकर व श्रेया डफळापूरकर यांनी नुकतीच राजश्री मराठीला मुलाखत दिली. या मुलाखतीत शाल्व व श्रेया यांनी त्यांच्या नात्याबद्दल, लग्नानंतर काय बदल झाले, याबरोबरच त्यांची ओळख कशी झाली होती, यावर वक्तव्य केले. या सगळ्यात शाल्वने या मुलाखतीत केलेले वक्तव्य चर्चेत आहे.या मुलाखतीत श्रेयाला विचारले की, शाल्वचे आई-वडील तुझे मित्र आहेत का? यावर बोलताना श्रेयाने म्हटले की, जेव्हा मला पाठिंब्याची



किंवा आधाराची गरज असते व ते माझ्यासोबत असतात ते माझे मित्र बनतात. नंतर ते आई-वडील आहेत. ते दोन्ही भूमिका सांभाळून घेतात. माझी सासू माझी खूप जवळची मैत्रीण आहे. दिवसातून एकदा बोलणं झाल्याशिवाय आमचा दिवसच जात नाही. जर मला काही माहीत असेल तर ते तिला माहीत असतंच. जर मला कोणी काही सांगत असेल तर ते माझ्या सासूला माहीतच असते. मी तिला ते सांगतेच. श्रेयाच्या या बोलण्यावर शाल्वने म्हटले की, मलाही कधीकधी ईर्ष्या वाटते. या दोघींचं काय चाललंय, या काय बोलतात किंवा चर्चा करत आहेत, असं मला कधी कधी वाटतं. पुढे श्रेयाने म्हटले की, माझी सासू खूप गोड व्यक्ती आहे. असे म्हणत श्रेयाने तिच्या सासूचे कौतुक केले आहे.दरम्यान, शाल्व सध्या 'शिवा' या मालिकेत प्रमुख भूमिकेत दिसत आहे. त्याने आशू ही भूमिका साकारली आहे, तर शिवाच्या भूमिकेत पूर्वा कौशिक दिसत आहे. दोन्ही कलाकारांनी त्यांच्या अभिनयाने प्रेक्षकांचे मनोरंजन करत त्यांची मने जिंकली आहेत. या मालिकेला नुकतेच एक वर्ष पूर्ण झाले. या निमित्ताने कलाकारांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत भावना व्यक्त केल्या होत्या, त्यांच्या प्रवासाबद्दल सांगितले होते. याबरोबरच प्रेक्षकांचेसुद्धा आभार मानल्याचे सोशल मीडियावर पाहायला मिळाले.

# न्यूझीलंडने पाकिस्तानचा उडवला धुव्वा!

## न्यूझीलंडने तिरंगी मालिकेच्या ट्रॉफीवर कोरले नाव

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**न्यूझीलंडने तिरंगी मालिकेच्या अंतिम सामन्यात पाकिस्तानचा ५ विकेट्सने पराभव करत जेतेपद पटकावले. किवी संघाने २८ चेंडू शिल्लक असताना हा सामना जिंकला आहे. या विजयामुळे २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी न्यूझीलंड संघाचे मनोबल वाढेल. डॅरिल मिशेल आणि टॉम लॅथम या दोघांनीही अर्धशतके झळकावून न्यूझीलंडला अंतिम सामना जिंकण्यास मदत केली.**

संपूर्ण मालिकेत एकही सामना न गमावता न्यूझीलंडने ट्रॉफीवर कब्जा केला आहे.कराचीच्या राष्ट्रीय स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात पाकिस्तान संघाने प्रथम फलंदाजी करताना २४२ धावा केल्या. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अगदी आधी, दबावाने भरलेल्या सामन्यात पाकिस्तान संघाचा कोणताही खेळाडू अर्धशतकही झळकावू शकला नाही, ही लाजिरवाणी गोष्ट आहे. कर्णधार मोहम्मद रिझवान व्यतिरिक्त सलमान आघाने



पुन्हा एकदा पाकिस्तान संघाची लाज राखण्याचा प्रयत्न केला. रिझवान आणि सलमान यांनी अनुक्रमे ४६ आणि ४५ धावा केल्या. तैय्यब ताहिरनेही ३८ धावांचे योगदान देत पाकिस्तानला २४२ धावांपर्यंत पोहोचवले. पाकिस्तानच्या २४३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडची सुरुवात खराब झाली. कारण विल यंग फक्त ३ धावा करून बाद झाला. त्याच्यानंतर, डेव्हॉन कॉनवे आणि केन विल्यमसन यांनी ७१ धावांची महत्त्वाची भागीदारी करून संघाचा डाव सावरला. यानंतर विल्यमसन ३४ धावांवर बाद झाला, तर कॉनवेही त्याच्या नंतर ४८ धावांवर बाद झाला. यानंतर डॅरिल मिशेल संघाची धुरा सांभाळली. त्याने मधल्या षटकांमध्ये ५७ धावा काढून न्यूझीलंडला विजय मिळवून दिला.टॉम लॅथमचा खेळी ५६ धावांत संपुष्टात आली असली, तरी त्याने संघाचा विजय जवळजवळ निश्चित केला होता. या सामन्यात न्यूझीलंडच्या विजयात डॅरिल मिशेल आणि टॉम लॅथम यांच्यातील ८७ धावांच्या भागीदारीने महत्त्वाची भूमिका बजावली.

# आरसीबीच्या पोरींनी घडवला इतिहास

## आरसीबीने 6 विकेट्सने विजय मिळवला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**वुमन्स प्रीमियर लीग २०२५ ला आजपासून सुरुवात झाली आहे. पहिलाच सामना गतवर्षीचा चॅम्पियन रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू वि गुजरात जायंट्स यांच्यात होता. यंदाच्या वुमन्स प्रीमियर लीगचा पहिलाच सामना ऐतिहासिक ठरला आहे. यंदाच्या स्पर्धेत सुरुवातीपासूनच रेकॉर्ड्स होण्याला सुरुवात झाली आहे. आरसीबीने पहिल्याच सामन्यात गुजरात संघाचा ६ विकेट्सने आणि ९ धावा राखून विजय मिळवला. या विजयासह आरसीबी संघाने इतिहास घडवला आहे.**

आरसीबीने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय योग्य असल्याचे आरसीबीने पहिल्या १० षटकांत सिद्ध केले. पण बेथ मुनी आणि अॅश्ले गार्डनर यांनी संघाला २०० अधिक धावांचा टप्पा गाठण्यात मदत केली.

बेथ मुनीने ४२ चेंडूत ८ चौकारांसह ५६ धावा केल्या. तर गुजरात संघाची कर्णधार अॅश्ले गार्डनरने ३७ चेंडूत ८ षटकार आणि ३ चौकारांसह ७९ धावांची वादळी खेळी केली. यासह गुजरातने पहिल्याच सामन्यात ५ विकेट्स गमावत २०१ धावांची खेळी केली.आरसीबीकडून रेणुका सिंगने २ विकेट्स घेतल्या. तर कनिका अहुजा, जॉर्जिया वेयरहम आणि प्रेमा रावत यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.यानंतर २०२ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना अॅश्ले गार्डनरने सुरुवातीच्या षटकांमध्ये दोन्ही सलामीवीरांना बाद करत संघाला मोठा धक्के दिले. पण आरसीबी याने डगमगला नाही. उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू एलिस पेरीने ३४ चेंडूत २ षटकार आणि ६ चौकारांसह ५७ धावांची शानदार खेळी केली. तर राघवी बिश्तने २५ धावा करत त्याला चांगली साथ दिली.

सायली सातघरे पेरीला तर डिएंड्रा डोटिनने राघवीला बाद करत चांगली भागदारी तोडली.पण यानंतर आलेल्या रिचा घोष आणि कनिका अहुजा यांनी गियर बदलत उत्कृष्ट कामगिरी करत ९३ धावांची धमाकेदारी खेळी करत अशक्य विजय संघाला मिळवून दिला. पहिल्याच सामन्याची सामनावीर ठरलेली रिचा घोष हिने २७ चेंडूत ४ षटकार आणि ७ चौकारांसह ६४ धावांची जबरदस्त खेळी केली आणि विजयी षटकारासह संघाला ऐतिहासिक विजय मिळवून दिला

वुमन्स प्रीमियर लीगच्या इतिहासात आरसीबीचा संघ सर्वात मोठ्या धावसंख्येचं लक्ष्य गाठणारा पहिला संघ ठरला आहे. आरसीबीने १० चेंडू शिल्लक ठेवत २०२ धावांचे विजयी लक्ष्य गाठले. यापूर्वी ही कामगिरी मुंबई इंडियन्सच्या नावे होती. ज्यांनी गतवर्षी गुजरातविरूद्ध १९१



### रेणुका सिंगने 2 विकेट्स घेतल्या

1 बेथ मुनीने ४२ चेंडूत ८ चौकारांसह ५६ धावा केल्या. तर गुजरात संघाची कर्णधार अॅश्ले गार्डनरने ३७ चेंडूत ८ षटकार आणि ३ चौकारांसह ७९ धावांची वादळी खेळी केली.

2 गुजरातने पहिल्याच सामन्यात ५ विकेट्स गमावत २०१ धावांची खेळी केली. रेणुकाने २ विकेट्स घेतल्या. तर अहुजा, वेयरहम आणि रावत यांनी १ विकेट घेतली.

3 २०२ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना अॅश्ले गार्डनरने सुरुवातीच्या षटकांमध्ये दोन्ही सलामीवीरांना बाद करत संघाला मोठा धक्के दिले.

# आता आयपीएलचे सामने फ्रीमध्ये पाहणं बंद!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

आयपीएलचे सामने म्हणजे क्रिकेट चाहत्यांसाठी एक सोहळा असतो. भारतासह इतर सर्वच देशांचे खेळाडू वेगवेगळ्या १० संघांमधून खेळत असतात. मुंबई इंडियन्स, चेन्नई सुपर किंग्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या आणि अशा सर्वच संघाचे चाहते सामने पाहण्यासाठी उत्सुक असतात. यापूर्वी आयपीएल सामन्यांचं लाईव्ह स्ट्रीमिंग मोफत पाहायला मिळत असे. पण आता तसं होणार नाही... क्रिकेट चाहते आयपीएलच्या मागील हंगामापर्यंत या लीगमध्ये खेळल्या जाणाऱ्या सामन्यांचे विनामूल्य लाइव्ह स्ट्रीमिंग पाहायचे पण आता यात बदल होणार आहे. आता VIACOM18 आणि STAR INDIA यांचे विलीनीकरण झाले आहे आणि आता जियोहॉटस्टार (JIOHOTSTAR) हा नवा अॅप सर्वांच्या भेटीला आला आहे. आता चाहत्यांना JIOHOTSTAR वर IPL सामन्यांचा मोफत आनंद घेता येणार नाही आणि त्यासाठी त्यांना पैसे खर्च करावे लागतील.जियो सिनेमा और डिझ्नी प्लस हॉटस्टार या दोन्ही स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मच्या



विलीनीकरणानंतर, शुक्रवारी नवीन स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्म JIOHOTSTAR लाँच करण्यात आले. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, चाहत्यांना आता सदस्यत्वाशिवाय आयपीएलचे लाईव्ह स्ट्रीमिंग काही मिनिटेच सामने पाहता येणार आहेत. मोफत सामन्याची वेळ संपल्यानंतर चाहत्यांना सबस्क्रिप्शनचा मेसेज पुन्हा स्क्रिनवर दिसेल.आयपीएल २०२५च्या सामन्यांचं संपूर्ण लाईव्ह स्ट्रीमिंग पाहण्यासाठी आता सबस्क्रिप्शन घ्यावं लागणार आहेपेंकची सुरूवात १४९ रूपयांपासून सुरू होत आहे. जियो सिनेमाने २०२३ मध्ये IPL लाइव्ह स्ट्रीमिंगचे अधिकार विकत घेतले होते आणि त्यासाठी ३ बिलियनचा व्यवहार केला होता. यानंतर, JIO CINEMA वर २०२३ आणि २०२४ मध्ये चाहत्यांना मोफत सामने पाहता

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे

# डॉ. वृषाली दंडवते यांना "उत्कृष्ट ग्रंथपाल" पुरस्कार!

## शिक्षण विश्व; विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान

। पुणे । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा 76 वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या दिनाच्या निमित्ताने वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**



डॉक्टर वृषाली साईनाथ दंडवते ( ग्रंथपाल ए आय एस एस एम एस कॉलेज ऑफ इंजिनीरिंग) यांना शहरी विभागातून उत्कृष्ट ग्रंथपाल हा पुरस्कार देण्यात आला.

मानपत्र स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. डॉक्टर वृषाली दंडवते या डिरेक्टरी ऑफ ओपन ऍक्सेस जर्नल या इंटरनॅशनल ऑर्गनायझेशनच्या आशिया खंडाच्या च्या सिनियर ॲम्बॅसिटर म्हणून पण काम पाहत आहेत.

# पवना धरणात १५ जूनपर्यंत पुरेल एवढाच पाणीसाठा शिल्लक



। पिंपरी-चिंचवड। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड शहराची तहान भागविणाऱ्या मावळातील पवना धरणातील पाणीसाठा वाढत्या उन्हामुळे कमी होऊ लागला आहे. सध्या ६२ टक्के पाणीसाठा असून, हा पाणीसाठा १५ जूनपर्यंत पुरेल एवढा आहे. त्यामुळे पाण्याचा वापर काटकसरीने करण्याचे आवाहन पाटबंधारे विभागाने केले आहे.

शहराला मागील साडेपाच वर्षांपासून एक दिवसाआड पाणी पुरवठा सुरू आहे. शहराची लोकसंख्या वाढत असल्यामुळे पाण्याची मागणीही सातत्याने वाढू लागली आहे. मावळातील पवना धरणातून ५१०, आंद्रा धरणातून ८०, एमआयडीसीकडून २० असे ६१० दशलक्ष लीटर (एमएलडी) एका दिवसाला शहराला पाणीपुरवठा केला जात आहे. भामा आसखेड धरणातून १६७ दशलक्ष लिटर पाणी आणण्याचे नियोजन आहे. त्यासाठी जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू आहे. या कामाला वेग आला असून, डिसेंबर २०२५ अखेर या जलवाहिनीचे काम पूर्ण करण्याचा मानस महापालिका प्रशासनाचा आहे.

मागील काही दिवसांपासून शहर आणि मावळातील पवना धरण परिसरात उन्हाचा चटका वाढू लागला आहे. पाण्याची मागणी वाढण्यास सुरुवात झाली आहे. उन्हामुळे बाष्पीभवनही होत आहे. त्यामुळे धरणातील पाणी पातळी घटू लागली आहे. पवना धरणातून पिंपरी चिंचवड शहरासह महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) मावळ तालुक्यातील काही ग्रामपंचायत व नगरपरिषदेला पाणी दिले जाते. सध्या पवना धरणात ६२ टक्के पाणीसाठा आहे. शहरवासीयांना सध्यातरी पाण्याची चिंता नाही.

# एकनाथ पवार यांचा नांदेडमध्ये भाजपात प्रवेश

## प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीमध्ये स्वगृही परतले

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड: भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी अध्यक्ष रवींद्रजी चव्हाण आणि खासदार अशोक चव्हाण यांच्या उपस्थितीत माजी सत्तारुढ पक्षनेते एकनाथ पवार यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.**




विधानसभा निवडणुकीपूर्वी एकनाथ पवार यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटामध्ये प्रवेश केला होता. "मशाल" चिन्हावर त्यांनी लोहाकंधार मतदार संघातून निवडणूक लढवली. या निवडणुकीत त्यांना 65 हजाराहून अधिक मते मिळाली आहेत. मात्र, निवडणुकीत पराभव झाला. ही जागा महायुतीमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाला मिळाली होती.

संघटन पर्व - विभागीय कार्यशाळा दौऱ्या निमित्त पश्चिम महाराष्ट्र विभाग बैठकी दरम्यान, शुक्रवार दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी नांदेड येथे हा कार्यक्रम पार पडला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र जी फडणवीस यांच्या आदेशाने हा प्रवेश करण्यात आला, असे सांगण्यात येते आहे.

दरम्यान, एकनाथ पवार यांनी लोहाकंधार मतदार संघातून पुढील राजकीय कारकीर्द घडवण्याचा इरादा केला असून, त्या अनुशंगाने नांदेडमध्ये कामाला सुरूवात केली आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच लागणार

## इच्छुकांच्या नजरा लागल्या, 25 फेब्रुवारीला सुप्रीम कोर्ट देणार

। पिंपरी-चिंचवड। महाईन्यूज । प्रतिनिधी।

सुप्रीम कोर्टातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकची सुनावणी निकाली लागणार आहे. येत्या २५ फेब्रुवारीला कोर्ट देणार निकाल असं समजत आहे. सध्या सर्वच राजकीय पक्ष संघटनात्मक आपापली मोर्चे बांधणी करताना दिसत आहेत. लवकरच कोर्टाचा निकाल येईल व त्वरित निवडणुका लागतील असं दिसतं आहे.

स्थानीक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी ९० दिवसांचा कालावधी असतो. त्यात प्रभाग रचना व निवडणुका उरकायच्या असतात. जर २५ फेब्रुवारी रोजी कोर्टाचा निकाल लागला तर मार्चच्या पहिल्या आठवड्यात किंवा दुसऱ्या आठवड्यात अगदी प्रभाग रचना जाहीर केल्या जातील. १५ दिवसांच्या आत त्यावर हरकती व सूचना मागवल्या जातील. त्यानंतर एप्रिल महिन्यात निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या जातील व मे महिन्यात मतदान आणि निकाल असेल. सूत्रांच्या माहितीनुसार निवडणुक आयोगाने जुन्या जनगनेच्या आधारे व नवीन मतदार नोंदणीच्या आधारे प्रभाग रचान आधीच तयार करुन ठेवली आहे. कालच्या मंत्रिमंडळाच्या बैठकी नंतर त्वरित मुंबई उपनगर नाशिक, नागपूर, संभाजीनगर या भागतील मुख्य अधिकाऱ्याची महत्व पूर्ण बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, नगरविकास खात्याच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या समवेत मुंबई येथिल सहियाद्री अतिथी गृहवर संपन्न झाली.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+ NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+ CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+ 17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+ TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+ 13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org

# देहूरोडमध्ये अंदाधुंद गोळीबार; दोन जखमी एकाचा मृत्यू

## दुचाकीवरून जात असताना थेट गोळीबार करण्यात आला, पोलिसांच्या हाती सीसीटीव्ही

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज

सीसीटीव्ही मध्ये दुचाकीवरून आलेल्या दोघांवर सराईत गुन्हेगार अंदाधुंद फायरिंग करत असल्याचं स्पष्ट दिसत आहे. पिंपरी-चिंचवड मधील देहूरोड मध्ये गोळीबाराच्या घटनेत एकाचा मृत्यू झाला असून दोघे जण जखमी आहेत. ही घटना गुरुवारी रात्री अकराच्या सुमारास घडली. या घटनेचा एक सीसीटीव्ही समोर आला असून सीसीटीव्ही मध्ये दुचाकीवरून आलेल्या दोघांवर सराईत गुन्हेगार अंदाधुंद



### सराईत गुन्हेगाराचा शोध सुरु

याच दरम्यान विक्रम गुरु स्वामी रेड्डी चा मृत्यू झाला आहे. तर इतर एक जण गंभीर जखमी आहे. दरम्यान त्याआधी देखील सराईत गुन्हेगाराने मारामारी केली यात. नंदकिशोर यादव नावाचा व्यक्ती गंभीर जखमी आहे. त्याच्यावर देखील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच देहूरोड पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते. पोलिसांच्या हाती सीसीटीव्ही लागला असून सीसीटीव्हीच्या आधारे पोलीस सराईत गुन्हेगाराचा शोध घेत आहेत.

फायरिंग करत असल्याचं स्पष्ट दिसत आहे. या घटनेमध्ये विक्रम गुरुस्वामी रेड्डी याचा मृत्यू झाला आहे. गुरुवारी रात्री वाढदिवसाच्या दरम्यान ही घटना घडली आहे. पूर्ववैमनस्यातून घडलेल्या घटनेमध्ये रेड्डी चा मृत्यू झाला आहे. रेड्डी आणि त्याचा सहकारी हे दुचाकीवरून जात होते. त्याच दरम्यान समोर उभा असलेल्या सराईत गुन्हेगाराने त्यांच्यावर फायरिंग केली.

